MEETING MINUTE BOOK ekal

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं. २०वी वार्षिक सर्वसाधारण सभा Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | | REMARKS शेरा |
|---|---|---|---|
| | नादब्रम्ह आसावरी सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा (२०वी) AGM आज दि. रविवार दि. ०५-०९-२०२१ रोजी सायं ठिक ३.३० वा. संस्थेच्या कार्यालयात श्री अरूण पाटिल यांच्या अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात आली. सभेला खालील सदस्य / पदाधिकारी उपस्थित होते. व खालील विषयांवर चर्चा-विनिमय करून निर्णय-ठराव घेण्यात आले. | | |
| | सभासदाचे नांव | सदनिका क्र. | सही |
| १) | अध्यक्ष : श्री. अरूण पाटिल | C/104 | A.K. Patil |
| ② | सचिव : श्री. महेश गुजर | C/201 | M.S.G. |
| ③ | खजिनदार : श्री. मनिष शिरसाट | E/404 | |
| 4 | सुरेश गोविंदराव करंजे | E/04 | |
| (5) | माधुरी शुक्ला | C/203 | माधुरी |
| (6) | अरुणा अ. विचारे | E/202 | अरुणा अ. विचारे |
| 7) | श्री. विजय कृष्णा मांडवकर | D/102 | |
| 8. | Prasad. M.R. | D/401 | Prasad M.R. |
| 9] | Mr. Suresh B. Shirgaonkar. | C/101. | |
| 10 | N - S खान | C401 | |
| 11) | Santosh G. Lambate | D/03 | Lambate |
| 12 | M.K. Chandiramani | C-301 | |
| 13 | Vijay Shingh | C 302 | |
| 14 | Sanket S. Dhure | E. 303 | S.S. Dhure |
| 15 | Bikiana Vaz | E-103 | |
| 16 | रघुनाथ गोपाळ कांबळे | D 202 | |
| 17. | संजय रा० राणे | E/01 | |
| 18 | Satish Gujar | C/103 | |
| 19 | Satyabodh P. Jadhav. | C/404 | Jadhav |
| 20 | Nikhil A. More | D/004 | |
| 21 | D.K. Parsekar | C/3 | D.K. Parsekar |

# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | | REMARKS शेरा |
|---|---|---|---|
| | सभासदाचे नाव | सदनिका क्र. | सही |
| 22 | नातालीन | D-101 | फर्नांडिस |
| 23 | विनोद रावराज | C102 | |
| 24 | Lalit. A. Makwana | E. 301 | Lalit |
| 25 | Satya prakash S Upadhyay | C/204 | Upadhyay |
| 26 | GANESH. B Deshmukh | D/402 | Deshmukh |
| 27) | Ashok N. Waghmare | D-201 | [signature] |
| 28) | Nitesh Deepak Jagtap | E-104 | [signature] |
| 29) | Arif Khan | E-02 | K. Arif |
| 30 | त्रिभुवन शर्मा | D 404 | [signature] |
| 31) | Maya Anand Kadam | E-201 | [signature] |
| 32) | Arpita Anil Jadhav | C-04 | A A Jadhav |
| 33) | Shakuntala Shankar Chougule | D-104 | S S Chougule |
| 34) | Bharati K. Pawar | D-303 | B K Pawar |
| 35) | madhukar pawar | D/302 | [signature] |

वार्षिक सर्वसाधारण सभेला सुरुवात करण्यापूर्वी संस्थेचे खजिनदार श्री मनिष शिरसाट ह्यांनी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे स्वागत करून हि सर्वसाधारण सभेचा कामकाज मागिल कार्यकालातिल व्यवस्थापिकीय ~~सभा~~ समितीचा असून त्यात २६वी ~~सभा~~ वार्षिक सभेत ठरल्याप्रमाणे ते करण्यात आले आहे व त्यास कोणाची ही हरकत असल्यास त्यांच्या शंकेचे निरसन करण्याचे ~~प्रयत्न~~ प्रयत्न करण्यात येईल असे अवगत करून श्री. अरुण पाटिल अध्यक्ष ह्यांना सभेचे अध्यक्षपद स्विकारून सभेचे सुरुवात करण्याची विनंती केली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून श्री महेश गुजर सचिव ह्यांस कामकाज सुरू करण्याची विनंती केली. तदनंतर सचिव श्री महेश गुजर ह्यांनी सभा संपण्यापूर्वी उठून न जाण्याची व शांततेने खेळी मेळीच्या वातावरणात सभासदांनी सभा

# MEETING MINUTE BOOK

ekai

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO.<br>ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS<br>हजर सभासद व ठराव | REMARKS<br>शेरा |
|---|---|---|
| | पार पाडावी असे विनंती केली. | |
| विषय क्र. १ | दि. ३१ मार्च २०२१ रोजी झालेल्या २६वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करून मंजुर करणे बाबत | |
| ठराव क्र. १ | मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताचे वाचन संस्थेचे सचिव श्री महेश गुजर ह्यांनी केले असता उपस्थितांनी इतिवृत्ताचा आढावा घेऊन सविस्तर चर्चा केली. कोणाची इतिवृत्ताबाबत शंका-कुशंका असल्यास सभासदांना वेळ देऊन त्याचे निरसरण करण्याचे प्रयत्न करण्यात येईल असे संबोधले. त्यावर श्रीमती शकुंतला चौघुले D-104 ह्यांनी आपण ठरविल्याप्रमाणे बिल्डिंग इंशुरन्स केले का असे विचारण्यात आले व ते कायदेशीर व गरजेचे आहे असे सुचित केले. ह्यावर बिल्डिंगचा विमा नव्याने उतरविण्यात आला असून, जरी त्याचा क्लेम मिळत नसला तरीही कायदेशीर बाबी लक्षात घेऊन तो दि. १/५/२०२१ पासून ३१/५/२०२२ ह्या काळा करिता काढण्यात आला आहे व त्यास खंड न पडू देता ते सुरु रहावेत असे ठरले. श्री सुरेश कदम ई-०४ ह्यांनी त्यास किती प्रिमियम द्यावे लागेल ह्याची नोंद घेऊन रु १२३७८ दिल्याचे कळविले. तदनंतर इतिवृत्ताबाबत कोणतीही हरकत नसल्याने सभासदांनी सर्वमताने ठराव मंजुर केला.<br>सूचक: अशोक वाघमारे<br>अनुमोदक: शकुंतला चौघुले<br>ठराव सर्वानुमते मंजुर. | |
| विषय क्र. २ | संस्थेच्या ०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ आर्थिक सालाचे जमा-खर्च नफा-तोटा व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे बाबत. | |
| ठराव क्र. २ | सचिव श्री महेश गुजर ह्यांनी खजिनदार श्री मनिष शिरसाट ह्यांना सभेपुढे जमा-खर्च नफा-तोटा व ताळेबंद पत्रकाचे तपशील सादर करण्याची विनंती केली. खजिनदार श्री मनिष शिरसाट ह्यांनी मागील वर्षीच्या व्यवस्थापिक समितीचा ताळेबंद सभासदांनी सुचविल्या सुचनांनुसार मांडण्यात आला आहे असे सुचित केले व कोणास काही हरकत, सुचना असतील तर त्यांची | |

## ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Date / तारीख

Meeting No. / सभा नं.

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | दुरुस्ती व निवारण करण्याचे प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले. श्री सुरेश शिरगावकर C-१०१ ह्यांनी वितरित झालेले व ऑडिट रिपोर्ट सकट सादर केलेले ताळेबंद ह्यात थोडा फरक आहे ह्याबाबत विचारणा केली असता खजीनदार ह्यांनी सभासदांपुढे मांडण्यात आलेला ताळेबंद हा सुधारित असून तो मांडण्यात आला. कारण की २०१८-२०१९ साली नादब्रम्ह फेडरेशन साठी जमा केलेली २५०१/- रक्कम २०२०-२१ सभासदांनी परत केली असता अनवधानाने ती ट्रान्सफर प्रिमियम मधुन निर्लेखित करण्यात आली ही चूक दुरुस्ती करून मेंबरांनी त्यांच्या मेंटेनन्स सर्विस मधुन वजावट दाखविण्यात आली आहे. तसेच रिपोर्ट प्रमाणे फेडरेशन फी व शिक्षण फी देणी बाबत विचारणा झाली असता ती सरकारी देणी असून त्यास ती गरजेची असल्या ऑडिटरशी सल्लामसलत करून भरण्यात यावी. सभासदांनी त्यांचे नोमिनेशनची नोंद करणे जरूरी आहे ते करावे असे सांगण्यात आले. श्री गणेश देवरूखकर - डि-१०२ ह्यांनी कनवेनियन्स डीडचे पैसे देण्यात आले का अशी विचारणा केली असता, ती देण्यात आली व त्यांची नोंद ताळेबंद मध्ये अधोरेखित केली गेली आहे असे सांगितले. श्री सुरेश कदम ह्यांनी क्लार्क पगारी विचारणा केली असता अध्यक्षांच्या परवानगीने माजी अध्यक्ष श्री मधुकर पवार ह्यांनी त्यांच्या शंकेचे निरसण केले की AGM च्या परवानगीने क्लार्क ठेवण्याचे ठरविण्यात आले तसेच कु. प्रज्ञा शिरगावकर ह्यांची निवड महिना रु ५०००/- मोबदला देऊन कामकाज (सोसायटीचे) करण्याचे ठरविले. ह्या उपरांत श्री नुरानी हरी - सी-४०१ ह्यांनी खजीनदार श्री मनिष शिरसाट ह्यांनाही ती रक्कम देण्याची शिफारीश केली असता खजीनदार ह्यांनी ती नाकारत तशी पदाधिकारांना ती घेण्याची कायद्यात तरतुदही नाही असे सांगुन सोसायटीचे कामकाज कमिटीच्या मदतीने तसेच गरज वाटल्यास त्या कामकाजांची मोबदला देऊन करण्याचे ठरविले. नादब्रम्ह रहिवाशी संस्थेचा २०२०-२१ | |

# MEETING MINUTE BOOK

ekal

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.　　　　　　　　　　　　　　Date / तारीख

| RESOLUTION NO.<br>ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS<br>हजर सभासद व ठराव | REMARKS<br>शेरा |
|---|---|---|
| | व २०२१-२०२२ची वार्षिक ~~वर्गणी~~ वर्गणी बाबत सांगण्यात आले त्यास वरिल सालाकरीता ती देण्यात यावी तसेच पुढिल महिन्यात ५०१/- व नव्हेंबर महिन्यात रु ५०१/-ची रक्कम सर्व सभासदांकडून मेंटेनन्स व सर्विस बिलामधून घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले ~~की रक्कम~~ थकबाकी बाबत श्री सुरेश शिरगावकर ह्यांनी आपली हरकत उपस्थित केली असता ती रजिस्टर्ड मार्फत ३ नोटिस देऊन करण्याचे ~~सां~~ सुचविण्यात आले असता श्री मधुकर पवार ह्यांना ती खर्चीक तसेच वेळ ~~क~~ लागू शकतो तसेच आपले कामधंदा सोडून ह्या कामाकरिता आपला वेळ कोण खर्च करणार अशी विचारणा केली। तद्पश्चात सभोपचाराने विनंती पूर्वक थकबाकी ~~जमा~~दाराने ती लवकरात लवकर जमा करावे व जे थकबाकीदार आहेत त्यांची नावे सभेपुढे सांगण्यात यावे व ते हजर असतील तर थकबाकी केव्हा पर्यंत जमा ~~करणार~~ करणार ह्याबाबत विचारणा केली असता ती त्यांनी डिसेंबर महिन्याच्या आत भरण्यात येईल असे आश्वासित केले. व जे थकबाकीदार आपली सदनिका भाडेतत्वार देऊन मेंटेनन्स देत नसतील तर भाडोत्रींच्या सोसायटी मार्फत मिळणाऱ्या सोयी बंद करण्यात यावे असे ~~ठ~~ सर्वानुमते ठरविण्यात आले. सोसायटीला पोस्ट व कुरियरच्या आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे ते केल्या उपरांतही आपली मासिक मेंटेनन्स येत नसल्याचे निदर्शनास आणले असता. ते वर्षातून बाहेरील सभासदांना दोन वेळा पाठवण्यात यावे व Whatsapp's च्या माध्यमातून त्यांचे मेंटेनन्स बिल, रिसिप्ट ~~व~~ इत्यादी पाठवविण्यात यावे असे ठरले वरील विषयावर चर्चा करून ठराव ~~सर्वा~~ सर्वानुमते मंजूर करण्यात आला<br><br>सूचक : त्रिभुवन शर्मा<br>अनु : आरिफ खान<br>ठराव सर्वानुमते मंजूर. | |

# ANNUAL / SPECIAL GENERAL
## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं.		Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| विषय क्र. (३) | सन ०१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ साला करिता लेखा परिक्षकाची नेमणूक करणेबाबत | |
| ठराव क्र (३) | सन - ०१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ साला करिता परिक्षकाची नेमणूक करणेबाबत चर्चा करण्यात आली कि सध्या आपली आर्थिक ताळेबंद लेखापरिक्षकाचे कामकाज श्री निलेश अशोक कुलकर्णी ह्यांनी उत्तम रित्या पार पाडली व त्याचे आभारही मानण्यात आले. श्री मधुकर पवार ह्यांनी लेखा परिक्षकांच्या मुदती विषयी विचारणा केली असता त्यांस कोणतीही हरकत नसल्यास श्री निलेश कुलकर्णी ह्यांना २०२१-२२ साला करिता पुन्हा नेमणूक करण्याचे ठरविण्यात आले. विषय सर्वानुमते मंजूर. | |
| | सुचक : ललीत मकवाना<br>अनु : एम आर प्रसाद<br>ठराव सर्वानुमते मंजूर | |
| विषय क्र (४) | पुनर्विकास प्रकल्पाकरिता सेमिनार पि.एम सी. मार्फत ठेवण्याबाबत. | |
| ठराव क्र. (४) | पुनर्विकास प्रकल्पाकरिता सेमिनार पि.एम.सी मार्फत आयोजित करणेबाबत सदनिकाधारकाने आपण केलेल्या रिपोर्टचा अहवाल मिळाल्यावर सदनिकाधारकांशी चर्चा करून आयोजीत करण्याबाबत ठरविण्यात आले. ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| | सुचक : मधुकर पवार<br>अनुमोदक : संतोष लंबाटे<br>ठराव सर्वानुमते मंजूर | |
| विषय क्र (५) | अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे इतर विषयांवर चर्चा करून निर्णय घेणेबाबत | |
| ठराव क्र (५). | सभासदाने पुनर्विकासाकरिता आपली लेखी स्वरूपात आपला अभिप्राय द्यावे जेणेकरून पदाधिकारी आपल्या कामाबाबत पुढील प्रक्रिया पार पाडू शकतील असे मत व्यक्त केले | |

# MEETING MINUTE BOOK

ekal

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | ~~कारण पुढील कोणते ही विषय नसल्याने खेळीमेळीच्या वातावरणात सभा तहकूब करण्यात आली~~ सभासद ~~आप~~ आपली सदनिका भाडे तत्वावर देताना रितसर परवानगी घेऊन ती द्यावी जेणे करून ~~कोण~~ असामाजिक गोष्टी घडली तर त्यास कायदेशीर कमिटीस जबाबदार धरले जाते त्यावर सर्व सभासदांनी ठराव पारित केला की जर, सोसायटीला न कळवता भाडेतत्वावर सदनिका ~~देणी~~ दिली तर ~~त्या~~ सभासदास रु ५०००/- दंड स्वरूपात आकारण्यात यावा. तसेच वाहन पार्किंग करतेवेळी रितसर सोसायटीस ~~कळवणे~~ कळविणे बंधनकारक राहील. ठराव सर्वानुमते मंजुर असे खेळी मेळीच्या वातावरणात सभा तहकूब करण्यात आली. | |
| | ठराव सर्वानुमते मंजुर. | |

For NAD-BRAHMA ASAVARI CO-OP.HSG.SOC.LTD.

AKPelte    [signature]    [signature]

CHAIRMAN    SECRETARY    TREASURER

[signature]

निबंधक
उपनिबंधक
सहकारी संस्था ...

9|12|21